

आजचे देवीचे रूप : महागौरी माता

दैनिक


अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

आजचा रंग मोरपंखी!



वर्ष : ०५ | अंक : ४५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२९ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# भारताचा पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राइक !

## विजयाचा 'तिलक' आशिया कप यशस्वी




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, दुबई :** भारताने पाकिस्तानवर क्रिकेटच्या मैदानातही सर्जिकल स्ट्राइक करून दाखवल आणि मिशन आशिया कप यशस्वी केले. आशिया कपमध्ये एकदाही पाकिस्तानला भारताला पराभूत करता आले नाही. भारताने फायनलमध्ये पाकिस्तानला १४६ धावांवर रोखले. पण आव्हानाचा पाठलाग करताना भारताचे तीन फलंदाज २० धावांवर बाद झाले. पण त्यानंतर तिलक वर्माने झंझावाती फलंदाजी करत संघाला पाच विकेट्स राखून विजय मिळवून दिला आणि भारताने आशिया चषक उचलला.

पाकिस्तानने भारतापुढे १४७ धावांचे आव्हान ठेवले होते. अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल मैदानात उतरले. चाहत्यांना चौकार-षटकारांच्या आतिषबाजीची आशा होती, पण तसे घडू शकले नाही. अभिषेकने चौकारासह सुरुवात केली खरी, पण त्याला यावेळी फक्त पाच धावाच करता आल्या. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव यावेळी पुन्हा एकदा अपयशी ठरला आणि तो फक्त एकच धावा करू शकला. भारताला त्यानंतर सर्वात मोठा धक्का बसला तो शुभमन गिलच्या रुपात. कारण गिल यावेळी स्थिरस्थावर होत होता, पण तोदेखील १२ धावांवर बाद झाला. त्यामुळे भारताची ३ बाद २० अशी अवस्था झाली होती. त्यावेळी भारताची भिस्त ही संजू सॅमसन आणि तिलक वर्मा या जोडीवर होती. संजू लवकर बाद झाला. पण तिलक वर्माने यावेळी धमाकेदार फटकेबाजी करत संघाला विजय मिळवून दिला.

पाकिस्तानच्या साहिबझादा फरहानने संघाला झोकात सुरुवात करून दिली. फरहान पहिले दोन षटकं संथपणे खेळला, पण त्यानंतर त्याने धडाकेबाज फटकेबाजी करायला सुरुवात केली. पाकिस्तानने यावेळी बिन बाद ८४ अशी दमदार सुरुवात केली होती. फरहानने यावेळी अर्धशतक झळकावले खरे, पण त्यानंतर तो ५७ धावांवर बाद झाला. आशिया कपच्या अंतिम सामन्यात कुलदीप यादवच्या शानदार कामगिरीमुळे भारताने पाकिस्तानला १९.१ षटकांत १४६ धावांत गुंडाळले.

सलामीवीर साहिबजादा फरहान (३८ चेंडूत ५७) आणि फखर झमान (३५ चेंडूत ४६) यांनी दहाव्या षटकापर्यंत ८४ धावांची भागीदारी केली होती. तथापि, भारतीय फिरकीपटूंनी शेवटच्या दहा षटकांत पाहुण्यांवर प्रचंड दबाव आणला. कुलदीपने चार षटकांत ३० धावांत चार बळी घेतले, तर अक्षर पटेलने चार षटकांत २६ धावांत दोन बळी घेतले आणि वरुण चक्रवर्तीने ३० धावांत दोन बळी घेतले. एका वेळी फखर आणि सैम अयुब क्रीजवर असताना पाकिस्तानची धावसंख्या एक बाद ११३ होती. त्यानंतर पाकिस्तानचा डाव पत्त्यांच्या घरासारखा कोसळला. कारण पाकिस्तानला यावेळी फक्त १४६ धावांवर समाधान मानावे लागले.

### बुमराहने हारिस रौफला लायकी दाखवली !

गेल्या सामन्यात हारिसने भारताच्या चाहत्यांना डिवचले होते पण यावेळी मात्र जसप्रीत बुमराहने त्याला बाद केले. हारिसला बाद केल्यावर बुमराहने जे सेलिब्रेशन केलं, त्याचा व्हिडिओ जोरदार व्हायरल झाला आहे.

हारिस रौफने गेल्या सामन्यात भारताच्या चाहत्यांना डिवचले होते. कारण भारताच्या चाहत्यांपुढे हारिस रौफने विमान पाडल्याची पोझ दिली होती. त्यानंतर हारिस रौफने ६-० असे दाखवले. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताची सहा विमानं पाडली, असे पाकिस्तानने म्हटले होते. ते हारिस रौफने यावेळी दाखवले होते आणि ही घृणास्पद कृती केली होती. पण हारिस रौफचा बदला यावेळी बुमराहने घेतला. हारिस फलंदाजीला आला तेव्हा त्याच्या बॅटची कडा लागली आणि त्याला चौकार मिळाला. यावेळी हारिस रौफ हा भारताला डिवचण्याचा प्रयत्न करत होता. पण बुमराह त्यावेळी गोलंदाजी करत होता. बुमराहने त्यानंतर जबरदस्त वेगवान चेंडू टाकला आणि त्याने हारिस रौफला क्लीन बोल्ड केले. त्यानंतर बुमराहने यावेळी जोरदार सेलिब्रेशन केले. हे सेलिब्रेशन करताना बुमराहने विमानं कशी खाली पडतात, हे हारिस रौफला दाखवले आणि भर मैदानात त्याला त्याची लायकी दाखवून दिली. या गोष्टीचा व्हिडिओ आता जोरदार व्हायरल झाला आहे.

# सोलापुरात पूरपरिस्थिती कायम; सीना नदीत सव्वा लाख क्युसेकने विसर्ग

# गावांना सावधगिरीचा इशारा!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, सोलापूर :** सोलापूर शहरासह जिल्ह्यात शुक्रवारी दुपारपासून मुसळधार पाऊस सुरू असून, पुन्हा एकदा शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. धाराशिव जिल्ह्यातही पाऊस बरसत असल्याने सीना नदीला पुन्हा पूर येण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

सीना नदीत सध्या चांदणी प्रकल्पातून ९ हजार ४२२, खासापुरीमधून २२ हजार ६६८, सीना कोळेगावमधून ६० हजार ५००; तर भोगावती नदीमधून २९ हजार ७०० असा एकूण एक लाख २२ हजार ३१० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

उजनी धरणातून शनिवारी सांडव्यातून ९० हजार क्युसेक व विद्युतगृहातून १६०० क्युसेक विसर्ग असा एकूण ९१ हजार ६०० क्युसेक वेगाने भीमा नदीमध्ये विसर्ग करण्यात येत आहे. भीमा नदीकाठच्या नागरिकांनी दक्षता बाळगावी असे,



आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

**विदारक परिस्थिती !**

उत्तर सोलापूर तालुक्यातील शिवणी आणि पाकणी गावासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागांत अत्यंत विदारक परिस्थिती आहे. गेल्या काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेला पूर आता ओसरला असला, तरी गावागावांतील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. रस्ते चिखलमय झाले असून अनेक घरांमध्ये अजूनही पाणी व चिखल साचलेला आहे. शेतात पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

✻ पूर परिस्थितीतून बाहेर काढलेल्या नागरिकांना ७२ शिबिरांमधून सर्व सोयीसुविधा उपलब्ध.

✻ पुरामुळे तीन लाख साठ हजार नागरिक बाधित झाले आहेत.

✻ बाधित कुटुंबीयांना दहा किलो तांदूळ आणि दहा किलो गव्हाचे वाटप करण्यात येणार आहे. या सर्वांना टँकरद्वारे स्वच्छ पाण्याचा पुरवठा देखील करण्यात येणार आहे. जिथे टँकर जाऊ शकत नाही, अशा ठिकाणी बोटीच्या साह्याने जारची व्यवस्था.

✻ जिल्हास्तरावर आणि तालुकानिहाय मदत केंद्र निर्माण करण्यात आली असून, मदत देण्यासाठी इच्छुक असलेल्या नागरिकांनी येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी केले आहे.

### साडेतीन लाख हेक्टरचे नुकसान!

जिल्ह्यात निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे सुमारे साडेतीन लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. चार हजारांहून अधिक व्यक्तींना सुरक्षित ठिकाणी स्थालांतरित करण्यात आले आहे.

तर एकाचा मृत्यू झाला आहे. बाधित नागरिकांना आवश्यक असलेली सर्व मदत प्रशासनाकडून करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

# मराठवाड्यात हाहाकार! १४१ मंडळांत अतिवृष्टी, जनजीवन ठप्प !!





**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात शुक्रवारी मध्यरात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. नांदेड, धाराशिव, बीड, हिंगोली, परभणी आणि लातूर या जिल्ह्यांना मोठा तडाखा बसला असून, विभागातील १४१ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली आहे. नदी-नाल्यांना पूर आल्यामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे. लातूर, धाराशिव जिल्ह्यांतील अनेक पुलांवरून पाणी वाहत असल्याने रस्त्यांवरील वाहतूक ठप्प झाली आहे.

मराठवाड्यात मुसळधार पाऊस सुरू असून, बहुतांश भागांत पुराचे संकट निर्माण झाले आहे. विभागात शुक्रवारी मध्यरात्री मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. बीड, धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांत पावसामुळे नदी-नाल्यांना पूर आला आहे.

पिके पाण्यात बुडाली असून, काही गावांना पाण्याचा वेढा आहे. पुरात अडकलेल्या ग्रामस्थांची 'एनडीआरएफ'च्या जवानांनी आणि स्थानिक प्रशासनाने सुटका केली. जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत पावसाची तीव्रता कमी आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड, पूर्णा, पालम तालुक्यांना पावसाने झोडपले असून, गंगाखेड-पालम महामार्ग ठप्प झाला होता.

धाराशिव ५४.५, हिंगोली ६६.२, परभणी ५८.१, नांदेड ५१.३, बीड ४१.२, जालना २.५ आणि छत्रपती संभाजीनगर ०.८ मिमी असा जिल्हानिहाय पाऊस झाला आहे. विभागातील तब्बल १४१ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली आहे. लातूर जिल्ह्यातील हडोळती आणि बीड



जिल्ह्यातील शिरूर कासार (१६३.५० मिमी) मंडळांत सर्वाधिक पाऊस झाला आहे. कमी कालावधीत जास्त पाऊस झाल्यामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे.

बंधारे, तलाव ओसंडून वाहत असल्याने शेतीचे नुकसान झाले आहे. धाराशिव जिल्ह्यातील परंडा, औसा, तुळजापूर, अनाळा, सोनारी, अंभी मंडळात मोठे नुकसान झाले आहे. नांदेड जिल्ह्यातील विष्णुपुरी, वाजेगाव, सगरोळी या मंडळांत अतिवृष्टी झाली आहे. लातूर जिल्ह्यातील माकणी-चोबळी, थोडगा-मोघा, निलंगा-कासार शिरसी, उदगीर-देगलूर, रेणापूर-कामखेडा या रस्त्यांसह ५६ रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले होते. रस्त्यांवर व पुलांवरून पाणी वाहत असल्यामुळे वाहतूक बंद करण्यात आल्याचे प्रशासनाने सांगितले. अतिवृष्टीमुळे भूम आणि परंडा तालुक्यातील पूरग्रस्त गावांत पुराचे संकट ओढवले आहे. शनिवारी



पहाटे झालेल्या अतिवृष्टीमुळे पाणी शिरलेल्या गावांचा आढावा जिल्हाधिकारी कीर्ती पुजार यांनी घेतला. एनडीआरएफ व आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या मदतीने एक हजार नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले.

दरम्यान, हवामान विभागाने हिंगोली जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जाहीर केल्यामुळे शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर यांनी जिल्ह्यातील शाळांना शनिवारी सुट्टी जाहीर केली. धाराशिव जिल्ह्यातील सिना कोळेगाव धरणातून सायंकाळी ८० हजार क्युसेकने विसर्ग करण्यात आला.

### पुरात अडकले नागरिक...

आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत चाकूर नगरपंचायतीच्या वतीने चाकूर शहरात घरामध्ये पाणी शिरलेल्या २० कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरण करण्यात आले. त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. अहमदपूर तालुक्यातील काम सुरू असलेल्या चिलखा बॅरेजवर जलसंपदा विभागाचे तीन मजूर अडकले होते. त्यांची सुटका करण्यात आले.

### सैन्यदलाकडून मदत...

हिंगोली जिल्ह्यात पावसामुळे उद्भवलेल्या छत्रपती संभाजीनगरातून लष्कराची तुकडी पाचारण करण्यात आली. मेजर कमाल तुकडीचे नेतृत्व करीत आहेत. हिंगोली-पुसद मार्गावरील वाहतूक बंद आहे. परळी-परभणी रेल्वे मार्गही पावसामुळे बंद आहे.

### नांदेड शहरात पाणी...

गोदावरी नदीने धोक्याची पातळी गाठलेली आहे. विष्णुपुरीचे प्रकल्पाचे १६ दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यामुळे नांदेड शहरातील खडकपुरा, दुल्हेशाह, रहेमाननगर, जी. एम. कॉलनी, गाडीपुरा, कालापूल परिसर, गंगाचाळ, भीमघाट, बिलालनगर, पाकीजानगर, शंकरनगर या भागांतील वस्त्यांमध्ये पाणी शिरले आहे.




## गर्दीच्या व्यवस्थापनत अपयशी

दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेते आणि नव्यानेच राजकारणात प्रवेश केलेले तमिळगा वेत्री कळघम या पक्षाचे प्रमुख विजय थलपती यांनी आयोजित केलेल्या सभेत चेंगराचेंगरी होऊन ३९ जण मृत्युमुखी पडले आणि १२ जण गंभीर जखमी झाले. शनिवारी रात्री घडलेल्या या दुर्घटनेचा व्हिडिओ प्रसार माध्यमात व्हायरल झाला. ही दुर्घटना जितकी धक्कादायक आहे तितकीच ती चिंताजनक आहे. कारण भररस्त्यात आयोजित केलेल्या या सभेत तब्बल ६० हजारांहून अधिक नागरिक उपस्थित होते. अतिशय छोट्या जागेत इतक्या मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहत असतील तर दुर्घटना घडेल हे शाळकरी मुलेही सांगतील. अभिनेते विजय यांनी पहिल्यांदाच अशी सभा केली असे नाही तर याआधीही त्यांनी काही दिवसांपूर्वी अशी रॅली आयोजित केली होती त्यातही लाखो नागरिकांची उपस्थिती होती तेंव्हाच अशी काही दुर्घटना घडली तर काय होईल अशी भीती व्यक्त करण्यात आली होती दुर्दैवाने ती भीती आता खरी ठरली अर्थात ही आपल्या देशात चेंगराचेंगरीची पहिली दुर्घटना नाही. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत. सध्या तर अशा दुर्घटनांची मालिकाच सुरू आहे. काही दिवसांपूर्वी बंगळुरू मध्ये झालेली चेंगराचेंगरीची दुर्घटना अजूनही ताजीच आहे. जून महिन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले होते. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळीही अशीच चेंगराचेंगरी झाली त्यात ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३० हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले होते. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली होती. आताही तशीच शोककळा देशभर पसरली आहे. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. या सभेला पोलिस आणि प्रशासनाने परवानगी दिली होती का ? कोणतीही सभा मोठ्या मैदानावर आयोजित केली जाते मग ही सभा रस्त्यावर का घेण्यात आली ? या सभेसाठी मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहणार याची कल्पना आयोजकांना आली नाही का? ज्या जागेची क्षमता वीस ते तीस हजार आहे तिथे दुप्पट नागरिक कसे जमा झाले ? ही सभा आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का ? इतकी मोठी सभा आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाशी, पोलिसांशी चर्चा केली होती का ? या सभेला अपेक्षेपेक्षा अधिक नागरिक जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का ? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेशे पोलिस बळ होते का ? ही राजकीय पक्षाची सभा होती. स्वतःचे राजकीय शक्तिप्रदर्शन दाखवण्यासाठी नागरिकांचा जीव धोक्यात घालणे कितपत योग्य? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ३९ नागरिकांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण ? आयोजक, तमिळनाडू सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही नागरिक? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सवप्रिय तसेच व्यक्तिपूजक आहेत. विशेषतः दक्षिणेत तर व्यक्तिपूजेचे मोठे अवडंबर आहे. यात तरुणांची संख्या अधिक आहे. नेते, अभिनेते यांना दैवत मानून त्यांच्या सभेत सहभागी होण्याची यांना फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ३९ नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# आजच्या आधुनिक जीवनशैलीत हृदयविकाराचा वाढता धोका

हृदयरोग ही जगभरात वेगाने वाढणारी आरोग्य समस्या आहे. आपल्या देशात ती शिगेला पोहोचली आहे. एक-दोन दशकांपूर्वीपर्यंत ही समस्या फक्त श्रीमंत वृद्ध लोकांमध्येच आढळते, असे वाटायचे. पण आता हा आजार आपल्या देशात खूप वेगाने पसरला आहे. मुले आणि तरुणही याला बळी पडत आहेत. देशातील सातत्याने वाढणारे प्रदूषण आणि भेसळीमुळे संपूर्ण जीवसृष्टी साठी धोका वाढला आहे आणि माणसाचा आळस, लोभ, निकृष्ट दर्जाचे अन्न, आधुनिक जीवनशैली आणि मानसिक ताण यामुळे मृत्यूच्या स्वरूपात आजारांना आमंत्रण मिळाले आहे. देशात, तरुण हृदयरोगतज्ज्ञ देखील हृदयरोगामुळे आपले प्राण गमावत आहेत. या वर्षी २०२५ च्या जागतिक हृदय दिनाची थीम एकही ठोका चुकवू नका आहे. ही थीम आपल्या हृदयाच्या आरोग्याला गांभीर्याने घेण्याची एक मजबूत आठवण करून देते, हृदयरोगाच्या सुरुवातीच्या चेतावणीच्या लक्षणांबद्दल सक्रिय राहणे आणि तपासणीला उशीर न करणे, निरोगी सवयी स्वीकारणे आणि वेळेवर वैद्यकीय हस्तक्षेप करणे यावर भर देते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, हृदयरोग हे जगभरातील मृत्यूंचे प्रमुख कारण आहेत. २०२२ मध्ये, अंदाजे १.९८ कोटी लोक हृदयरोगाने मरण पावले, जे जागतिक स्तरावरील एकूण मृत्यूंपैकी अंदाजे ३२ टक्के आहे. यापैकी ८५ टक्के मृत्यू हृदयविकार आणि स्ट्रोकमुळे झाले. अमेरिकेत दर ३४ सेकंदाला एका व्यक्तीचा हृदयरोगाने मृत्यू होतो आणि २०२३ मध्ये, हृदयरोगामुळे ९,१९,०३२ मृत्यू झाले, म्हणजेच दर तीन मृत्यूंपैकी एक. तंबाखूचा वापर, अस्वास्थ्यकर आहार (मीठ, साखर आणि तेलाचे जास्त प्रमाण) आणि लठ्ठपणा, शारीरिक निष्क्रियता, आक्रमकता, चिडचिड, राग, नैराश्य, चिंता, भेसळ, हानिकारक मद्यपान आणि वायू प्रदूषण यासारख्या वर्तणुकीशी संबंधित आणि पर्यावरणीय जोखीम घटकांवर लक्ष देऊन बहुतेक हृदयरोग टाळता येतात. हृदयरोगाचे लवकरात लवकर निदान करणे महत्वाचे आहे जेणेकरून समुपदेशन आणि औषधोपचाराने व्यवस्थापन सुरू करता येईल.

दिल्लीस्थित आकाश हेल्थकेअरने केलेल्या पाच वर्षांच्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की कोविड-१९ साथीच्या आजारानंतर हृदयरोगाच्या रुग्णांमध्ये दुप्पट वाढ झाली आहे आणि आपत्कालीन रुग्णांमध्ये ६० टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०२० ते २०२३ दरम्यान भारतातील रुग्णालयांमधून गोळा केलेल्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की हृदयरोगाच्या रुग्णांपैकी ५० टक्के रुग्ण ४० वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत, ही एक अतिशय गंभीर समस्या आहे. गेल्या ४-५ वर्षांत तरुणांमध्ये या आजाराच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. जोखीम घटकांमध्ये उच्च रक्तदाब (२४ टक्के), मधुमेह (१० टक्के) आणि डिस्लिपिडेमिया (३९ टक्के) यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, धूम्रपान (३६ टक्के), जास्त मद्यपान (१६ टक्के), अपुरी शारीरिक हालचाल (११ टक्के) आणि खराब आहाराची गुणवत्ता (१२ टक्के); वैयक्तिक आणि कामाशी संबंधित ताण आणि नैराश्य यासारखे मानसिक घटक; आणि जीवनातील घटना (३२ टक्के) ज्यामुळे इंट्राव्हस्कुलर थ्रोम्बोसिसचा धोका वाढतो आणि परिणामी, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी घटना. याव्यतिरिक्त, अनुवांशिक घटक आणि सामाजिक-आर्थिक असमानता परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनवतात. तंबाखूशी संबंधित हृदयरोगामुळे जगभरात १.९ दशलक्ष मृत्यू होतात.

गुजरातमधील जामनगर शहरातील प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. गौरव गांधी (४१) यांचे त्यांच्या राहत्या घरी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. अहवालांनुसार, डॉ. गांधी यांनी त्यांच्या कारकिर्दीत १६,००० हून अधिक हृदय शस्त्रक्रिया केल्या होत्या. अलिकडेच, ३९ वर्षीय हृदयरोगतज्ज्ञ डॉ. ग्रॅडलिन रॉय यांचे चेन्नईतील एका रुग्णालयात कामावर असताना अचानक हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. गोव्यात झालेल्या ३२ किमी मॅरेथॉनमधील सहभागी, ३९ वर्षीय दंतचिकित्सक, फिटनेस उत्साही यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. पुनीत राजकुमार, सिद्धार्थ शुक्ला, राजू श्रीवास्तव, गायक केके आणि नुकत्याच निधन झालेल्या ४२ वर्षीय शेफाली जरीवाला यांसारख्या अनेक तंदुरुस्त आणि निरोगी चित्रपट सेलिब्रिटींच्या मृत्यूचे कारण देखील हृदयरोग होते. काही महिन्यांपूर्वी, महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील एका प्रसिद्ध तरुण कुस्तीपटूचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. कर्नाटकमध्ये, एका २८ वर्षीय तरुणाचा क्रिकेट सामन्यातील विजयाचा आनंद साजरा करताना मृत्यू झाला आणि एका २५ वर्षीय वराचा लग्न समारंभात मंगळसूत्र बांधल्यानंतर लगेचच मृत्यू झाला.



विविध भागांमध्ये व्यायामादरम्यान तरुणांचा मृत्यू झाल्याच्या घटनाही नोंदवल्या गेल्या आहेत.

आता लहान शाळकरी मुलांनाही हृदयरोगामुळे जीव गमवावा लागल्याच्या बातम्या खूप वाढल्या आहेत. अहवाल दर्शवितात की देशात दरवर्षी १४ वर्षांखालील शेकडो मुले हृदयविकाराच्या झटक्याने किंवा हृदयविकाराने जीव गमावतात. राजस्थानमधील सिकर येथील एका शाळेत ९ वर्षांच्या मुलीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. अलिगडमधील एका १४ वर्षांच्या मुलाचा शालेय क्रीडा स्पर्धेची तयारी करताना हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. काही दिवसांपूर्वीच, महाराष्ट्रातील कोल्हापूर येथे एक १० वर्षांचा मुलगा त्याच्या घरासमोर खेळत होता, तेव्हा त्याला अचानक अस्वस्थ वाटू लागले, तो घरी गेला आणि त्याने त्याच्या आईला पिण्यासाठी पाणी मागितले आणि तो आईच्या कुशीतच मरण पावला. यापूर्वी, महाराष्ट्रातील नाशिकमध्ये एका ६ वर्षांच्या शाळकरी मुलीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

वायू प्रदूषणामुळे दरवर्षी ७० लाख मृत्यू होतात, ज्यामध्ये इस्केमिक हृदयरोग हे या मृत्यूंचे एक प्रमुख कारण आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा अंदाज आहे की दरवर्षी अंदाजे ४.२ दशलक्ष अकाली मृत्यू बाहेरील वायू प्रदूषणामुळे होतात. वायू प्रदूषण असलेल्या भागात राहणारे लोक; रस्ते, रेल्वे, बंदरे किंवा औद्योगिक क्षेत्रांजवळ राहणारे किंवा काम करणारे लोक, वणव्याच्या धुराच्या संपर्कात येणारे लोक, धूम्रपान न करणारे पण दुसऱ्याने केलेल्या धूम्रपानाच्या धुराच्या संपर्कात येणारी मुले यांचे आरोग्यावर हानिकारक आणि असंख्य परिणाम होतात. दुसऱ्याने केलेल्या धुम्रपानातील धुराच्या संपर्कात आल्याने हृदयरोग आणि स्ट्रोक, फुफ्फुसांचा कर्करोग, अचानक शिशु मृत्यु सिंड्रोम, वारंवार आणि गंभीर दम्याचे झटके आणि इतर गंभीर आरोग्य समस्या उद्भवतात. अनेक अभ्यासांनी वायू प्रदूषण आणि हृदयाच्या आरोग्यामधील स्पष्ट संबंध स्थापित केला आहे. जेव्हा लोक प्रदूषित हवेत श्वास घेतात, तेव्हा सूक्ष्म कण फुफ्फुसांमध्ये खोलवर जाऊ शकतात आणि रक्तप्रवाहात प्रवेश करू शकतात. यामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी समस्या उद्भवू शकतात, ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे: वाढलेला रक्तदाब, हृदयाच्या लयीत अडथळा, हृदयविकाराचा धोका वाढणे, एथेरोस्क्लेरोसिस आणि असुरक्षित लोकसंख्येवर परिणाम.

अधिक जागरूकता, चांगली तपासणी आणि जीवनरक्षक उपायांची उपलब्धता वाढवून हृदयरोगामुळे होणाऱ्या अकाली मृत्यूंचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी केले जाऊ शकते. देशातील व्यापक प्रदूषण, भेसळ आणि अस्वच्छता रोखण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली पाहिजेत. जर आधुनिक जीवनशैली आपल्या आरोग्यासाठी हानिकारक असेल तर अशी जीवनशैली सोडून देणेच चांगले. संतुलित आहार घेणे हे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे. फळे आणि भाज्या, प्रथिने, निरोगी वसा, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचे संतुलन राखा. तुमच्या जीवनशैलीत दररोज ३० मिनिटे व्यायामाचा समावेश करून सुरुवात करा. हृदयाच्या चांगल्या आरोग्यासाठी, शारीरिक हालचाली वाढवण्यासाठी आणि निरोगी वजन राखण्यासाठी कोई भी शारीरिक व्यायाम, हेल्दी छंद महत्त्वाचा आहे. मीठ, साखर आणि तेलाचे सेवन नेहमी कमी करा. दररोज रात्री ७-८ तासांची पुरेशी झोप घ्या. तंबाखू, दारू किंवा इतर कोणतेही व्यसन ताबडतोब सोडून द्या. तुमच्या दैनंदिन दिनचर्येत तणाव कमी करणारे उपक्रम समाविष्ट करा. स्वच्छता पाळा, पर्यावरण सांभाळा. जीवनातील समस्या शहाणपणाने, शांततेने आणि विवेकाने सोडवा, ताण घेऊ नका. व्यस्त वेळातून स्वतःसाठी थोडा वेळ आनंदी क्षण जगा, कधीकधी तुमचे बालपण देखील जगा.

**जीवनाचा प्रत्येक क्षण आनंदाने सकारात्मकतेने जगा...**



**-डॉ.प्रीतम भी.गेडाम**
**मोबाईल**
**८२३७४ १७०४१**

# नवसाला पावणारी चिंचपाड्याची नवदुर्गा...

दुर्गा माता ही हिंदू धर्मातील एक शक्तिशाली देवी आहे, जिला आदिशक्ती मानले जाते आणि ती 'अजिंक्य' या अर्थाने ओळखली जाते. तिने दुर्गम राक्षस व इतर अनेक राक्षसांचा वध करून वाईटावर चांगल्याचा विजय मिळवला. ती पार्वती, चंडी, काली अशा अनेक रूपांमध्ये ओळखली जाते आणि नवरात्रात तिची विशेष पूजा केली जाते... अशीच काहीशी कल्याण पूर्वेतील चिंचपाड्याची नवदुर्गा म्हणून साईकृपा मित्र मंडळ गेली १९वर्षे नवरा नवरात्रोत्सव परंपरा मोठ्या उत्साहात जपत आहे. ही संस्कृती जपताना समाज आणि राष्ट्राला उपयुक्त ठरतील, असे अनेक बदल स्वीकारून मंडळाने एक वेगळा आदर्श देवी भक्तांना दिला आहे. सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या या मंडळाने आतापर्यंत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. तसेच विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार लहान मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम चित्रकला स्पर्धा व मान्यवरांची गाठी-भेटी आयोजित करण्यात आली आहेत. समाज प्रबोधन करण्याचा वसा मंडळींने घेतला आहे.कल्याण (पूर्व) चिंचपाडा विभागातील उत्कृष्ट मंडळ म्हणून साई कृपा मित्र मंडळ उदयास येत आहे मराठी भक्ती संगीत सांप्रदायिक छंदिक भजन कार्यक्रम ठेवण्यात येतो मंडळाचे संस्थापक राजेश महावीर सौर्य सांगतात मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे मंडळाचा प्रत्येक सदस्यच हा अध्यक्ष..!! मूर्तीचे देखणे रूप हेच मंडळाचे खासियत.. चिंचपाडा आजूबाजूच्या भागातील नागरिक आपले नवस बोलण्यासाठी देवीकडे साकडं घालण्यासाठी येत असतात देवी घटस्थापनेपासून ते विसर्जनापर्यंत सकाळ /संध्याकाळ दैनंदिन देवीची ८ वाजता महाआरती होते. मंडळांनी गुरुवार दिनांक दोन नोव्हेंबर रोजी सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत भंडारा महाप्रसाद आयोजित केला आहे तसेच देवी तीन नोव्हेंबर रोजी सायं. विसर्जन सोहळा आयोजित केला असून विसर्जनाच्या



दिवशी मंडळ लाईट डॉल्बी चा वापर न करता पारंपारिक वाद्याच्या तालावर देवींची विसर्जनाची सांगता करतात...!! या कार्यक्रमासाठीकिशन सिंह, तेजश भुगे, रामजी देवाशी, रमेश भागवत, अमृतलाल जैन, सुभाष भोईर, हरीश म्हात्रे, संतोष शेलार, मनोहर चौधरी, आनंद तिवारी, शिवाजी चौगुले, गणेश सौर्य, मदन मारवाडी (स्वीट मार्ट) आणि संजीव सौर्य हे कार्यकर्ते मेहनत घेतात. अशी ही कल्याण पूर्वेची नवसाला पावणारी चिंचपाडाची नवदुर्गा...!! आई पर्यावरण संरक्षणासाठी सर्वांना जाणीवा दे...'कष्टाने मिळते तेच टिकते' हा पाठ सर्वांच्या ध्यानी असू दे' पृथ्वी मातेचा संहार टाळण्यासाठी, निसर्गचक्र अबाधित राखण्यासाठी सर्व मानवांना पर्यावरणाचे, सर्व प्रकारचे प्रदूषण टाळण्याची बुद्धि दे, प्लास्टिकच्या अतिवापरावर निर्बंध आणण्याचे शहाणपण दे. आई तू सकल विश्वाची निर्माती आहेस, फक्त तुझ्या भक्तांना योग्य मार्गावर आण. तंत्रज्ञानाच्या जगात माणूस माणसाजवळ येऊ दे.. सर्वांना आरोग्य चांगले दे..जय आई दुर्गा माता तुझ्याकडे फक्त इतकेच मागणं तुझ्याकडे...!!

**मनोगत संस्थापक :-**
**श्री.राजेश महावीर सौर्य...**

**साईकृपा मित्र मंडळातर्फे २००६ पासून नवरात्रोत्सव साजरा केला जातो गणपती उत्सव, रामनवमी, हनुमान जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरे केले जातात. आदी कार्यक्रमाचे आयोजन करत मंडळ सामाजिक बांधिलकी जपते.**

## महाराष्ट्रहितासाठी होणारं, गर्जना ठाकरेंची दसरा मेळाव्यात तोफ धडाडणारं...

दरवर्षीप्रमाणेचं यंदाही उद्धव ठाकरे दसरा मेळावा शिवतीर्थावर घेणारं आहेत यंदा या मेळाव्याचे विशेष आकर्षण आहे ते म्हणजे मनसे प्रमुख राज ठाकरे यांची उपस्थिती ? निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांची तोफ धडाडणारं की नाही याबाबत अजून खुलासा झालेला नाही मात्र ठाकरेंच्या शिवसेनेचा नवा टिझर आलेला आहे महाराष्ट्रहितासाठी होणारं, गर्जना ठाकरेंची आणि हि गर्जना मुंबई जिंकण्यासाठी पुरेशी आहे का ? ३० ऑक्टोबर १९६६ साली शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी शिवाजी पार्कवर पहिला दसरा मेळावा घेतला होता. दसरा मेळावा आणि शिवाजी पार्क हे एक समीकरण बनलं. त्याला आता ५९ वर्षे पूर्ण होतील. इतकी वर्षे शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेणारा शिवसेना हा एकमेव पक्ष असेल अनेक राजकीय पक्षांकडून दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात येतं. पण एक पक्ष, एक नेता आणि एक मैदान हे शिवसेनेतच बघायला मिळत असल्याचं अनेक जाणकार सांगतात हिच खरी शिवसेनेची दसरा मेळाव्याची खासियत आहे यावेळी पक्षप्रमुख काय बोलतात याकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिलेले आहे या मेळाव्यास संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून कार्यकर्ते येतं असतात शिवसेना या पक्षात भविष्यातली रुपरेखा, वाटचाल दसरा मेळाव्यात जाहीर केली जाते यंदा दसरा मेळाव्यावर पावसाचे सावट आहे राज्यांत अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तोच मुद्दा पकडून मोठी गर्जना केली जाण्याची शक्यता असून आगामी काळात होवू घातलेल्या महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे काय बोलतात याकडे राजकीय वर्तुळासह संपूर्ण महाराष्ट्र आणि दिल्लीचे लक्ष लागले आहे !

**- राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

## महा गौरी मा..

वृषभावरी महा गौरी
जाग्रत आनंदेअष्टमी
बालिकापूजन करता
ना ओळखले दुष्ट मी

केवळहात जोडे तुला
झालो कसा संतुष्ट मी
डंका वाजे अहंकारात
समजेभक्त उत्कृष्ट मी

तवकृपा गे महाप्रसाद
चिवडे का उच्छिष्ट मी
उपवासा क्लेषे शरिरा
बनू पाहे भक्त श्रेष्ठ मी

मनमात्र मलीनकायम
कसा राहणार जेष्ठ मी
खूप केला दानधर्म तो
स्वकियातवाटे भ्रष्ट मी

ना जाणतो नारीशक्ती
झेलले अपार कष्ट मी
हीन कन्या भार्या माय
स्वतांवरतीच संतुष्टमी

पश्चात्ताप यज्ञात भस्म
क्षमामागे तव स्पष्ट मी
कपाळा अंगारा फासे
तव शरणा आकृष्ट मी

शांत झालो तव जागरे
शुंभ निशुंभ कोपिष्टमी
तव सुध्दादृष्टि ममवरी
होई चाकर निविष्ट मी

**– हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बारडची शितलादेवी जाज्वल्य देवस्थान !

### नवसाला पावणारी पोचम्मा ; अष्टमीला दूध, तांबोळ प्रसादाला महत्त्व



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२८, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील बारड येथील शितलादेवी जाजवल्य देवस्थान म्हणून प्रसिद्ध असून नवसाला पावणारी पोचम्मा भक्तांचे श्रद्धास्थान ठरली आहे. नवरात्र महोत्सवात गोंधळ, जागर, भजन, किर्तन या धार्मिक कार्यक्रमासह अष्टमीला सामूहिक महाआरती सोबत दुग्ध व तांबोळ प्रसादाला अनन्य साधारण महत्त्व आहे.

नवरात्र महोत्सवात मंदिर परिसरात विद्युत रोषणाईसह गावरान आकर्षक फुलांच्या सजावटीने सजविण्यात आला आहे. देवीच्या आदर्शनासाठी नारी शक्ती सह भक्तांची अलोट गर्दी असून उदे ग अंबे उदे देवीचा जयघोष पहावयास मिळत आहे. नवसाला पावणारी देवी म्हणून ख्याती असून भक्तगण नवसाची परतफेड करण्यासाठी धरणे धरून उपवासासह आराधना करतात. सुवासिनींची ओटी भरून भोजनदान केले जाते. देवीला भक्त डोळे, फुलं, ताव, ओटीचे सामान, पातळ यासह चांदीचे कृत्रिम अवयव वाहतात. यासोबतच भक्त देवीला कोंबडे, शेळ्या सोडतात. अष्टमीच्या दिवशी विशेष महोत्सवाचे आयोजन केले जाते. या दिवशी सकाळी देवीला दूध, दही, तूप यांसह पंचामृताने अभिषेक केला जातो. देवीला जरीचे वस्त्र परिधान केले जातात.

पोचमादेवी ला दीडशे वर्षांपूर्वीचा इतिहास असून देवीचा उगम विहिरीत असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे मंदिरा लगत असलेल्या विहिरीला भक्तगण मनोभावे पूजा अर्चना करतात . देवस्थानासाठी स्वातंत्र्य सेनानी साहेबराव देशमुख बारडकर यांनी१४ गुंठे जागा दान दिली आहे. वडाच्या झाडाच्या पारंब्या खाली मंदिर असून गाभाऱ्यात दीड फूट उंचीची हळदी कुंकाने माखलेली सुरेख मूर्ती आहे. या मूर्तीला सोन्या चांदीचे अलंकार, जरीचे वस्त्र, चांदीचे टोप, छत्र यांनी सजविण्यात आले आहे. देवीला पुरणपोळीचा नैवेद्य चढवीला जातो. अष्टमीला फुलोरा चढविण्याची पद्धत परंपरा आजही कायम आहे. यावर्षीचे विश्वस्त म्हणून सतीश लक्ष्मीकांत कुलकर्णी, मिलिंद लक्ष्मीकांत कुलकर्णी, दीपक लक्ष्मीकांत कुलकर्णी कार्यरत आहेत. पुजारी म्हणून पंडित मोकाशी तर सेवेकरी म्हणून दासा निलेवार कार्यरत आहेत. देवस्थानाच्या वतीने भक्तांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

## समृद्धी महामार्गावर अज्ञाताचा 'मृतदेह' सापडला

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.२७, शहापूर (ठाणे) :** शहापूर जवळुन जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या बाजूला खुटघर जवळ चॅनल नंबर ६७३ येथे दि. २४, २५ सप्टेंबर च्या दरम्यान सदरील फोटोतली व्यक्ती वय अंदाजे (३०-३५) वर्षे जखमी अवस्थेत सापडल्या नोंद शहापूर पोलीस स्टेशन मधे दाखल करण्यात आली असुन, सदरील व्यक्ती ला ऊप जिल्हा रुग्णालय शहापूर येथे आणले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले आहे. सदर व्यक्ती च्या पाठीस खरचटलेल्या जखमा तसेच तोंडातून रक्त येत होते,त्याच बरोबर बाजुला इंडिकेटर चे तुकडे देखील पोलिसांना आढळून आले. सदर व्यक्ती अंगाने सडपातळ असुन अंगावर निळ्या फिकट रंगाची हाफ पँट असुन ऊंची ५.६ईंच आहे. याबाबतचा गुन्हा क्र.३१९/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १०६(१),२८१,१२५(अ), १२५(ब)तसेच मोटार वाहन अधिनियम १८४ प्रमाणे शहापूर(ठाणे) पोलिस स्थानकात फिर्याद दाखल करण्यात आली आहे अशी माहिती पोलीस ऊप निरिक्षक सुरेश बाविस्कर यांनी दिली आहे. सदर व्यक्ती बाबत कोणाला काही माहिती असल्यास शहापूर पोलीस स्टेशन मधे संपर्क साधावा.

## मानपाडा पोलीस ठाणे हद्दीत नवरात्र उत्सव निमित्त रूटमार्च



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२७, डोंबिवली :** नवरात्र उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी मानपाडा पोलीस ठाण्याच्या वतीने सायंकाळी ५ ते ६ या वेळेत रूटमार्चचे आयोजन करण्यात आले. या रूटमार्चसाठी सहाय्यक पोलीस आयुक्त डोंबिवली विभाग सुहास हेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे व गुन्हे विभागाचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचा ताफा सहभागी झाला.

रूटमार्चची सुरुवात पिसवली गाव कमान येथून करण्यात आली. त्यानंतर हा ताफा शिवाजीनगर, जिल्हा परिषद शाळा पिसवली, पिसवली गाव, देशमुख होम्स मार्गे पुढे जात टाटा नाका येथे समाप्त झाला.

या रूटमार्चमध्ये डोंबिवली विभागातून एकूण १५ अधिकारी व ५५ अंमलदार सहभागी झाले होते. यावेळी परिसरातील नागरिकांना जातीय तेढ निर्माण न करणे, अफवांवर विश्वास न ठेवणे याबाबत सूचना देण्यात आल्या. नवरात्रोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी पोलिसांचा हा उपक्रम नागरिकांत समाधान व सुरक्षिततेची भावना निर्माण करणारा ठरला.

## मुदखेड तालुक्यात ४७ किलो वजनी गटात शिवराज गाढे प्रथम

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२८, मुदखेड (नांदेड) :** तालुकास्तरावर नुकत्याच पार पडलेल्या कुस्ती स्पर्धेमध्ये ४७ किलो वजनी गटात शिवराज गाढे यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. ही स्पर्धा स्थानिक क्रीडा सिंधी ता उमरी येथे मोठ्या उत्साहात पार पडली, ज्यात तालुक्यांतील विविध गावांतील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

शिवराज गाढे यांनी आपल्या ताकदीच्या आणि कुशलतेच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत अंतिम फेरीत जागा मिळवली. अंतिम सामन्यांत त्यांनी दमदार कामगिरी करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. त्यांच्या विजयामुळे त्यांच्या महाटीता मुदखेड आणि चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या यशाबद्दल त्यांचे प्रशिक्षक विजय शिंदे, गोविंद ढगे आणि गावकरी यांनी त्यांचे कौतुक केले असून, पुढील जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. शिवराज गाढे यांचा हा विजय तालुक्यांतील युवकांसाठी प्रेरणादायी ठरतो आहे.

# विष्णुनगर (विंचूर) परिसरात दोन दिवसांचा मुसळधार पाऊस

## पिकांचे लाखोंचे नुकसान, शेतकऱ्यांची भरपाईची मागणी



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२८, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुकासह विष्णुनगर (विंचूर) परिसरात सलग दोन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपार पासून सुरू झालेला पाऊस रविवार, दिनांक २८ सटेंबेर २०२५ रोजी उशिरापर्यंत अखंड सुरू राहिल्याने गावातील नाले तुडुंब भरून वाहू लागले आहेत. त्यामुळे शिवारातील शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली आहे. या पावसामुळे खरीप हंगामातील सोयाबीन, मका, कांदा यासारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतातील सोयाबीन पूर्णपणे गळून पडले आहे, तर मका पूर्णपणे आडवा झाला आहे. द्राक्ष व डाळिंबाच्या बागा ही पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांना लाखोंचे नुकसान सोसावे लागणार आहे.

पावसामुळे केवळ शेतीच नव्हे तर रस्त्यांवरही पाणी साचून वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. गावाकडील रस्ते तळ्यासारखे दिसत असून शाळकरी मुलांसह नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य ती भरपाई देण्याची मागणी केली आहे. तसेच द्राक्ष व डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष मदत जाहीर करण्याची मागणी होत आहे. सलग दोन दिवसांपासून झालेल्या पावसाने शेतकरी वर्गाची कंबर मोडली आहे. शेतकरी वर्गामध्ये प्रचंड चिंता व नैराश्याचे वातावरण असून शासनाने तातडीने मदतकार्य राबवले नाही तर शेतकरी रस्त्यावर उतरतील, असा इशारा स्थानिक शेतकरी संघटनांनी दिला आहे.

आम्ही हंगामभर कष्ट करून पिके उभी केली होती.आता दोन दिवसांच्या पावसाने सगळे पाण्यात वाहून गेले. कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा हा मोठा प्रश्न आहे. कर्ज काढून मका व सोयाबीन लावली होती. आता पूर्ण पिके पाण्यात बुडाल्याने कर्ज कसं फेडायचं? सरकारने तातडीने मदत केली नाही तर आम्ही उभं राहू शकणार नाही.

**- सूर्यभान घायाळ (शेतकरी)**

पावसामुळे द्राक्ष बागा पूर्णपणे पाण्यात गेल्या आहेत.फळांची गुणवत्ता बिघडेल, उत्पादनावर परिणाम होईल. लाखोंचे नुकसान झाले आहे. सरकारने तातडीने मदत केली नाही तर आम्ही उभं राहू शकणार नाही.

**- ज्ञानेश्वर देसले (शेतकरी)**

# खा.धानोरकर यांच्या मागणीनंतर पालकमंत्री डॉ.उईके यांचे 'ऑन द स्पॉट' आदेश

## स्वस्त धान्य दुकानांतील तांदूळ घोटाळ्याची चौकशी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** जिल्हा नियोजन विकास समितीच्या बैठकीत चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी अनेक अत्यंत महत्वाचे आणि ज्वलंत मुद्दे अत्यंत प्रभावीपणे उपस्थित केले. यावर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी तात्काळ कार्यवाही करण्याचे 'ऑन दी स्पॉट' आदेश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले असून, हे सर्व प्रश्न लवकरच निकालात काढण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी यावेळी सांगितले की, स्वस्त धान्य दुकानात मिळणाऱ्या तांदळासंदर्भात मोठा घोटाळा असून, शासनाकडे विविध वाणांचे तांदूळ उपलब्ध असताना, सर्व स्वस्त धान्य दुकानांमध्ये एकाच वाणाचा तांदुळ उपलब्ध असतो, याची सखोल चौकशी करण्यात यावी. त्यासोबतच, डीपीडीसीमधील महिलांच्या सक्षमीकरणासाठी असलेल्या ३ टक्के राखीव निधीतून मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये सॅनिटरी व पॅड डिस्पोजेबल मशीन लावण्यात यावी. तसेच ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात स्थानिक नागरिकांसाठी प्रवेश शुल्क कमी करण्यात यावे, जेणेकरुन स्थानिकांना या प्रकल्पाचा लाभ घेता येईल, अशी महत्वपूर्ण मागणीही त्यांनी केली.

याशिवाय, शासकीय महाविद्यालयातून उपचारा दरम्यान मृत पावलेल्या रुग्णांना घरापर्यंत पोहोचण्याकरता मोफत शववाहिका जिल्हा वार्षिक योजनेतून खरेदी करुन उपलब्ध करुन द्यावी. पडोली ते पठाणपूरा, जुनोना चौक ते गांधी चौक मार्गे दुर्गापूर, बंगाली चौक ते नवीन चंद्रपूर तसेच बंगाली कॅम्प ते एमआयडीसी या नवीन शहरात अंतर्गत धावणाऱ्या ई-बसेस जिल्हा वार्षिक योजनेतून खरेदी कराव्या.

शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्याकरीता व ग्राहकांना थेट योग्य माल मिळण्याकरीता कृषी विभागाच्या माध्यमातून धान महोत्सव डिसेंबर महिन्यात साजरा करण्याकरीता जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. जिल्हा वार्षिक योजनेतून १० वी व १२ वी मध्ये सीबीएसई व स्टेट बोर्डमधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात यावे आणि जिल्हा संग्रहालयाला नाविण्यपूर्ण योजनेतून निधी व जागा उपलब्ध करुन देण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांना देण्याची विनंती त्यांनी पालकमंत्र्यांना केली.

सर्वात महत्वाचे म्हणजे, जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या मुलांच्या पालकांना ग्रामपंचायतीच्या घर टॅक्स व पाणी करातौ १० टक्के सुट देण्यात यावी. ज्यामुळे झेपी शाळांमधील विद्यार्थी संख्या वाढेल, असा महत्वाचा प्रस्ताव त्यांनी मांडला. पालकमंत्री डॉ.उईके यांनी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी उपस्थित केलेले हे सर्व मुद्दे गांभीर्याने घेतले असून, अधिकाऱ्यांनी या सर्व विषयांवर कालमर्यादेत कार्यवाही करुन अहवाल सादर करावा, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

# महाराष्ट्र ऑलिम्पिकला क्रीडा विभागाची कारणे दाखवा नोटीस

## राष्ट्रीय क्रीडा अनुदानचा हिशोब ८ दिवसांत द्या

**अक्षराज : प्रतिनिधी**


**दि.२८, पूणे :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी मिळालेल्या महाराष्ट्र शासन अनुदानाचा हिशोब सादर न केल्याप्रकरणी क्रीडा संचलनालयाने नुकतीच महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या महासचिवांना (एमओए) कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. क्रीडा सहसंचालक सुधीर मोरे यांच्या सहीने ही नोटीस पाठविण्यात आली आहे. महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांनी माजी खासदार रामदास तडस यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच 'एमओए'च्या ऑफिस बाहेर आंदोलन केले होते.

या आंदोलनात कुस्तीपटू, 'तायक्वांदो'चे महासचिव मिलिंद पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व जिल्हा संघटनेचे पदाधिकारी, तायक्वांदोपटू तसेच जलतरणपटू मनोज एरंडे, अर्जुन पुरस्कार विजेते बॉक्सिंग खेळाडू मनोज पिंगळे, हॉण्डबॉल संघटनेचे राजाराम राऊत आदींनी सहभाग घेतला होता. उपोषणा दरम्यान संदीप भोंडवे यांनी 'एमओए'च्या महासचिवांच्या कामकाजाच्या चौकशीची मागणी क्रीडा आयुक्त व पोलिसांकडे निवेदनाद्वारे तक्रार केली होती. त्यांची ही मागणी मान्यकरून क्रीडा सहसंचालक सुधीर मोरे यांनी ट्रॅक सुट, टी-शर्ट,शुज, ब्लेझरचा दर्जा कोणी तपासला व त्याबाबतची सर्व कागदपत्रे उपलब्ध करून पात्र निविदाधारक कोण होता. त्यास देण्यात आलेला कार्यारंभ आदेश प्रत, कामाचे डिलेव्हरी बिल, वस्तुसंग्रह नोंदवहीमध्ये साहित्य नोंदवलेची प्रत, पात्र निविदाधारकाने सादर केलेल्या बीलाची प्रत, बिल अदा केल्याबाबत टिपणीच्या प्रतीसह सर्व कागदपत्रे तात्काळ करून देण्यात यावे. तसेच खेळाडूंना साहित्य वाटप केल्याचा नावासह तक्ता देण्यात यावा. यासह १६ मुद्यांवर अहवाल मागीतला आहे. त्यात म्हटले की, वेळोवेळी अहवाल सादर करण्यास सांगून ही तो सादर करण्यात आला नाही. ही बाब गंभीर असून सर्व माहितीसह ८ दिवसांत क्रीडा संचालनालयास संपूर्ण अहवाल व हिशोब दिनांक ०३ ऑक्टोबर पर्यंत सादर करावा.

अन्यथा हा निधी व्याजासह का वसूल करण्यात येऊ नये. तसेच भविष्यात आपल्या संस्थेस शासकीय अनुदान देण्यात येऊ नये. अशी शिफारस शासनास का करण्यात येऊ नये, याचा खुलासा करावा. अशी नोटिस बजावण्यात आली आहे. अहवालातील प्रमुख मुद्दे -१. ३६, ३७ व ३८ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिर कोणत्या जिल्ह्यामध्ये आयोजित करण्यात आले.

या प्रशिक्षण शिबिरात किती खेळाडू, मार्गदर्शक, व्यवस्थापक उपस्थित होते. त्यांचे उपस्थिती पत्रक सादर करण्यात यावे.२. प्रशिक्षण शिबिरासाठी ट्रॅकसूट, टी-शर्ट,शुज, ब्लेझर आदीबाबींची निविदा प्रक्रिया राबविल्याबाबत सविस्तर तपशिल कागदपत्रासह उपलब्ध करून देण्यात यावा.३. ट्रॅक सूट, टी-शर्ट, शुज, ब्लेझर याबाबींची निविदा काढण्यासाठी 'एमओए'च्या बैठकीचे इतिवृत्त प्रत, निविदा प्रक्रिया प्रसिध्द करण्यासाठी देण्यात आलेल्या पत्राची प्रत,निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर वृतपत्राची प्रत, निविदा कोणत्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली, किती निविदा प्राप्त झाल्या, प्राप्त निविदांचे तांत्रिक कागदपत्रे, तुलनात्मक तक्ता, व्यापारी लिफाफा कागदपत्रे, प्रशिक्षण शिबिरासाठी खेळनिहाय खेळाडूंची उपस्थिती पत्रक व खेळाडूंची यादी.

## किल्ले प्रतापगडावर ३६६ मशालींचा 'शिव'प्रकाश



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२८, सातारा :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या दैदीप्यमान पराक्रमाची साक्ष देणारा आणि हिंदवी स्वराज्याचा महत्त्वाचा आधारस्तंभ असलेला किल्ले प्रतापगड दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री एका अभूतपूर्व उत्साहात न्हाऊन निघाला. आई भवानी मातेच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापनेला ३६६ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या मशाल महोत्सवात सह्याद्रीच्या पर्वतरांगेतील किल्ले प्रताप गडावर शिवभक्तांकडुन ३६६ मशाली प्रज्वलित करण्यात आल्या. या शिवसोहळ्याला हजारोंच्या संख्येने शिवभक्त साक्षीदार झाले. तळकोकणातून मोठ्या संख्येने शिवप्रेमी या उत्सवात सहभागी होण्यासाठी गडावर दाखल झाले होते ज्या मुळे शिवभक्तांचा उत्साह गगनाला भिडला होता. छत्रपतींच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यात किल्ले प्रतापगड हा स्वराज्यासाठी टर्निंग पॉइंट ठरला. याच गडावर झालेली अफजल खान वधाची लढाई इतिहासात आजही अजरामर आहे. छ.शिवाजी महाराजांनी नेपाळच्या गंडकी नदीमधील शाळिग्राम दगड मागवून त्या पासून आई भवानी मातेची मूर्ती बनवून घेवून किल्ले प्रतापगडावर स्थापन केली आहे.

# ९९९ मायमाऊलींचा सन्मान; पालकमंत्री प्रा.डॉ.उईके यांची महोत्सवाला भेट

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** भक्तिरसाच्या अखंड झऱ्याने ओथंबलेल्या श्री माता महाकाली महोत्सवात सुप्रसिद्ध गायिका पलक मुच्छल यांच्या गोड सुरांनी वातावरण भारावून गेले. त्यांच्या स्वरातून उमटलेली प्रत्येक ओळ भक्तांच्या अंतःकरणातील प्रार्थना ठरली. यावेळी पलक मुच्छल यांनी ही आपल्या भक्तिसंगीताने भाविकांना मंत्रमुग्ध केले. तर महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके यांनी महोत्सवाला भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते ९९९ ज्येष्ठ मायमाऊलींचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला श्री माता महाकाली महोत्सवाचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार, भद्रावती वरोरा विधानसभा क्षेत्राचे आमदार करण देवतळे, डॉ. विजय देवतळे, माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल, कोषाध्यक्ष पवन सराफ, विश्वस्त जयश्री कापसे, बलराम डोडाणी, भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, भाजपचे जेष्ट नेते प्रकाश देवतळे, नामदेव डाहुले, दशरथसिंह ठाकूर, तुषार सोम, वंदना हातगावकर, रवी गुरुनले, अरुण तिखे आदि मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी रात्री ८ वाजता सुप्रसिद्ध गायिका पलक मुच्छल यांच्या सुरेल भक्तीगीत कार्यक्रमाला सुरुवात झाली. तत्पूर्वी माता महाकालीची महाआरती पार पडली. मंद वाऱ्यात हेलकावणाऱ्या पताकांप्रमाणे शेकडो भाविकांचे मन पलक मुच्छल यांच्या गाण्यांच्या लयीवर झुलत होते. जय माता दी च्या घोषणांनी महोत्सवाचे वातावरण अधिकाधिक पवित्र झाले. संगीताच्या दरबारात स्वरांच्या आरतीने मातेचे पूजन भाविकांना घडले.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या आरतीनंतर ११ वाजता महिलांचे जागर कवितेचे कवी संमेलन पार पडले. यात कवयित्रींनी कवितांच्या माध्यमातून जनजागृती करत मातेची भक्ती केली. दुपारी २ वाजता ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने आयोजित ९९९ ज्येष्ठ मायमाऊलींचा पालकमंत्री डॉ.प्रा अशोक उईके यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तत्पूर्वी ना. उईके यांनी चित्र प्रदर्शनीचे उद्घाटन केले. त्यानंतर ना. उईके आणि आमदार करण देवतळे यांच्या हस्ते माता महाकालीची आरती करण्यात आली. दुपारी ३ वाजता स्थानिक कलावंतांचा नृत्यजल्लोष कार्यक्रम पार पडला.



आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून महाकाली महोत्सवाला सुरुवात झाली आहे. यंदाचे हे चौथे वर्ष असून सदर महोत्सवाच्या माध्यमातून येथील संस्कृती देशभरात पोहोचवली जात आहे.

महोत्सवात भक्तीसह सामाजिक उपक्रमांना देखील मोठ्या प्रमाणात स्थान देण्यात आले आहे. राजकारणात समाजकार्य करणारे नेते म्हणून किशोर जोरगेवार यांची ओळख असून मंदिर परिसराच्या विकासासाठी आमदार जोरगेवार प्रयत्न करत आहे. मंदिर परिसराचा विकास करण्यासाठी आम्ही सुद्धा कटिबद्ध आहोत, असे या कार्यक्रमात बोलताना आदिवासी विकासमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री अशोक उईके म्हणाले. आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास सांगणारे हे मातेचे मंदिर आहे. मातेच्या आशीर्वादामुळे आम्ही आज सक्षम आहोत. नवरात्र हा नारीशक्तीचा उत्सव असून या महोत्सवाच्या माध्यमातून नारीशक्तीचा सन्मान होत असल्याचे त्यांनी सांगितले. महाकाली महोत्सव ही केवळ धार्मिक परंपरा नाही, तर ती आपल्या संस्कृतीचा श्वास आणि समाजाची ताकद आहे. देवीची आराधना ही स्त्रीशक्तीचे, मातृत्वाचे आणि धैर्याचे प्रतीक आहे. महाकाली म्हणजे अन्यायाविरुद्धचा संघर्ष आणि सत्यासाठीची निष्ठा आहे.

या महोत्सवाच्या निमित्ताने आपण एकत्र येतो; विविध जात, धर्म, भाषा असलेले लोक एका मातेच्या छत्राखाली नतमस्तक होतात हीच खरी भारतीय संस्कृती आहे. महोत्सवाच्या काळात आयोजित होणारे सांस्कृतिक कार्यक्रम, भक्तिगीतांचे गायन, धार्मिक विधी आणि सामाजिक उपक्रम हे आपल्या समाजाला नवचैतन्य देणारे आहेत. या परंपरेतून आपल्या पिढ्यांना श्रद्धा, शिस्त आणि सामूहिकतेचा धडा मिळतो, असे सांगत त्यांनी महाकाली महोत्सवातील विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे कौतुक केले.

# जगाचा पोशिंद्यासाठी पैशाच्या श्रीमंतांनी मनाची श्रीमंती कृतीतून सिद्ध करावी - प्रा.अमीर इनामदार

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२७, खंडाळा (सातारा) :** ०२ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५६ वी जयंती आहे.सद्यस्थितीत महात्मा गांधी यांच्या खेडी स्वयंपूर्ण आणि विकसित व्हायला पाहिजेत. यासोबत विश्वस्त सिद्धांताची आवश्यकता आहे, असे संवादरुपी विश्लेषण केले. दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना आयोजित राष्ट्रीय एकात्मता सप्ताह निमित्त स्वयंसेवकांशी संवाद साधताना राज्यशास्त्र विभागात कार्यरत सहा.प्राध्यापक अमीर इनामदार म्हणाले, सुमारे ९५ वर्षांपूर्वी म्हणजेचं १९३० साली महात्मा गांधींचा 'विश्वस्त सिद्धांत' मांडला होता.

ज्यानुसार समाजात आर्थिक विषमता कमी करण्यासाठी श्रीमंत लोकांनी आपली संपत्ती समाजाच्या कल्याणासाठी वापरणाऱ्या विश्वस्तांप्रमाणे जतन करावी. या तत्त्वज्ञानानुसार, श्रीमंतांनी स्वतःला मालमत्तेचे मालक न मानता समाजाचे विश्वस्त समजावे आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी या संपत्तीचा उपयोग करावा, अशी गांधीजींची भूमिका होती.

सद्यस्थितीत हा विश्वस्त सिद्धांत शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीस अंमलात आणावा. सामाजिक उत्तरदायित्व म्हणून जगाचा पोशिंदा आणि जगण्याची गरज पूर्ण करणाऱ्या माझ्या शेतकरी राजाचं अस्मानी संकटाने महाराष्ट्र मध्ये हजारो कोटींचं नुकसान झालंय; मदतीसाठी तो व्यवस्थेपुढे विनवणी करतोय, महाराष्ट्र सरकार कर्जाच्या बोजाखाली आहे. हे नुकतंच सिद्ध झालंय. दरवर्षी भारतातील अतिश्रीमंत व्यक्तींची यादी जाहिर केली जाते. जगाच्या पोशिंद्याने कसलेल्या शेतीतून भाकरी खाणाऱ्या आणि दिवसाला कोटीची कमाई करणाऱ्यांनी भाकरीला जाणीवेतून जागत आपली एका दिवसाची कमाई मोठ्या दिलाने दिलीत तर;कष्टकऱ्यांच्या याचना,यातना आणि हतबलतेचा महापूर आटोक्यात आणेल.

भारतात आर्थिक घोटाळे करून पळून गेलेल्या श्रीमंत लोकांमध्ये विजय मल्ल्या, नीरव मोदी, मेहुल चोक्सी,ललित मोदी आणि नितीन संदेसरा यांचा समावेश आहे.मोठे आर्थिक घोटाळे,पंजाब नॅशनल बँकेची फसवणूक,आणि इतर आर्थिक गुन्ह्यांसाठी भारतात दोषी ठरले आहेत आणि सध्या ते परदेशात राहत आहेत,सरकारकडून या घोटाळेबाजांची किती बेहिशेबी संपत्ती गोठवण्यात आलीय अशी माहिती प्रसिद्धी माध्यमातून मिळतेय त्यांच्या बेहिशेबी संपत्तीचा वापर आर्थिक गर्तेत अडकलेल्या माझ्या शेतकऱ्यांच्या उभारणीसाठी व्हावा असे माझे ठाम मत आहे.

पृथ्वीवरील जगाच्या पाठीवर, कोणत्याही देशात देशातील कोणत्याही राज्यात; राज्यातील कोणत्याही गावात असो वा शहरात कितीही पैशाने श्रीमंत असणारा



माणूस असूदेत तो पैसे खाऊन जगलेला नाही आणि जगतही नसेल, शेतीत पिकवल्याशिवाय अन्न मिळणार नाही, सद्या अन्नदाता अडचणीत आहे.त्याला आत्मियतेने आधार देण्यासाठी पैशाच्या श्रीमंतांनी, मनाची श्रीमंती बड्या दिलाने सिद्ध करावी... वेळ कधीही बदलू शकते. कदाचित उद्या श्रीमंत ही संकटात सापडू शकेल. माझ्या नम्र निवेदनाचा प्रसार कृतीतून होण्यासाठी तमाम विद्यार्थी, युवा, सुज्ञ नागरिक अशा विचारी माणसांनी प्रयत्न करावा, सरकार आणि नेते मान्यवर नुकसानग्रस्त भागात दौरे करून गर्तेत सापडलेल्या माझ्या शेतकरी बांधवांना आश्वासनरुपी धीर देतंय पण; सध्या तातडीने आर्थिक रकमेची आणि नुकसान भरपाईची गरज आहे. यावेळी प्रा. इनामदार यांनी विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची संवादरूपी उत्तरे दिली.

# महाबळेश्वर जनता नागरी सह.पतसंस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२७, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथील जनता नागरी सह पतसंस्था मर्या. महाबळेश्वरची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा येथील हॉटेल अल्बा सभागृहात अध्यक्ष आसिफभाई मानकर यांच्या अध्यक्षतेखाली बहुसंख्य सभासदांच्या उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न झाली.

यावेळी व्यासपीठावर व्हा चेअरमन रियाजभाई डांगे, राजूभाई नालबंद, मुक्तार बागवान, नसीम पन्हाळकर, डॉ. सलीम मानकर, फैमिदानाझ वलगे यास्मिन सय्यद, संजय साळुंखे, अकबर शारवान, राजमोंहमद पन्हाळकर, मुख्य व्यवस्थापक अरिफ शारवान आदी उपस्थित होते.जनता नागरी सह पतसंस्थेच्या सर्वसाधारण सभेस उपस्थित सभासदांचे स्वागत संचालिका, माजी नगरसेविका फैमिदानाझ वलगे यांनी केले. प्रास्ताविक संचालक संजय साळुंखे यांनी केले. संचालक मुक्तार बागवान यांनी दिवंगतांना श्रद्धांजली वाहिली नोटीस वाचन व्यवस्थापक अरिफ शारवान यांनी केले. मागील सभेचे इतिवृत्त वाचन राजूभाई नालबंद यांनी केले. डॉ.सलिम मानकर यांनी अंदाज पत्रक वाचन केले. वैधानीक लेखापरीक्षण अहवाल वाचन व्हा.चेअरमन रियाज डांगे यांनी केले. चेअरमन असिफभाई मानकर यांनी अहवाल वाचन व नफा तोटा पत्रक, ताळेबंद वाचन करताना पतसंस्थेने या आर्थिक क्षेत्रात प्रंचड स्पर्धा निर्माण झालेली असताना देखील ऑडिट वर्ग अ कायम राखला असल्याचे सांगितले तसेच संस्थेचे भागभांडवल १६७.१४ लाख, ठेवी २०६०.७६ लाख, गुंतवणूक ९०१.०६, कर्जे



१७५३.३४ लाख व नफा २५.११ लाख रुपये झाला असल्याची माहिती सभासदांना दिली सभासदांच्या विश्वासाच्या जोरावर संस्थेस मागील २८ वर्षापासून ऑडीट वर्ग 'अ' कायम राखला आहे. तसेच सभासदांना आज पर्यंत ८ % लाभांश वाटप केले असल्याचे चेअरमन मानकर यांनी सांगितले व थकबाकी व एनपीए कर्ज वसुली करिता सभासदांनी सहकार्य करावे असे आवाहन केले. जेष्ठ संचालक नसिम पन्हाळकर यांनी आभार मानले. या सर्वसाधारण सभेस अर्बन बँक मुख्य व्यवस्थापक फकीरभाई वलगे, रियाजभाई सय्यद, मुबारकभाई शेख, जमालुद्दिन नालबंद, इस्माईल (दादा) मानकर, गणी भाई मानकर, सूर्यकांत शिर्के, प्रकाश सांळुखे, महामूद खारकंडे, संतोष अगवणे, रियाज मुजावर, सयाजी लांगी, जावेद वारुणकर आदींसह इतर मान्यवर सभासद उपस्थित होते.

# नदीत आत्महत्या करण्यास गेलेल्या महिलेचे वाचवले प्राण; सपोनि शिंदे यांची कौतुकास्पद कामगिरी

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२७, कुंडलवाडी (नांदेड) :** बिलोली तालुक्यातील अर्जापुर गावातील एका ४५ वर्षीय महिला शेळगाव (थडी) जवळील गोदावरी नदीवरून उडी मारून आत्महत्या करण्यास गेली असताना तिला कुंडलवाडी पोलीसांनी वाचविल्याची घटना दि.२७ सप्टेंबर २०२५ रोजी ६ वाजता घडली आहे. कुंडलवाडी पोलीसांनी कौतुकास्पद कामगिरी केली असुन संबधीत महिलेची समजुत घालून त्यांना कुटुंबाच्या स्वाधीन केले आहे. कुंडलवाडी पासून जवळच असलेल्या अर्जापुर गावातील पंचशीला लालू कांबळे (४५ वर्ष) हि महिला आपल्या २ मुली व एक मुला सोबत राहते.नवरा मयत आहे.दि.२७सप्टेंबर रोजी कौटुंबिक वादातून महिला शेळगाव(थडी)जवळील गोदावरी नदीवरून उडी मारून जीव देण्याचा निर्णय घेतला होता.त्यावेळी तेथून जात असलेल्या लोकांनी नदीच्या पुलावर महिला दिसल्याने महिलेकडे विचारपूस केली.महिलेने मला जगायचं नाही. मला आत्महत्या करायची आहे. असे उत्तर दिल्याने काही लोकांनी हि बाब कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांना दिली. तात्काळ शेळगाव(थडी) येथे जात महिलेस आत्महत्या करण्यापासून वाचवून कुंडलवाडी पोलीस ठाण्यात आणले. तिथे महिलेचे आई यांना बोलावून घेतले व महिलेची समजुत काढले व सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे व महिला पोलीस कर्मचारी अरूणा श्रीवास्तव यांनी महिलेचे समुपदेशन करून महिलेस तिच्या आईच्या स्वाधीन करण्यात आले.

## थोडक्यात

# नांदूर मधमेश्वर प्रकल्पातून ७९ हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग

## गोदावरी काठावरील नागरिकांनी दक्षता घ्यावी



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२८, विंचूर (नाशिक) :** नांदूर मध्यम प्रकल्पातून आज (दि.२८ सप्टेंबर २०२५) दुपारी २ वाजल्यापासून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. प्रकल्पातून सुरुवातीला ६८,४८० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग होत असून, त्यात ११,०६१ क्युसेक्सने वाढ करून एकूण ७९,५४१ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात आला असल्याची माहिती जलसंपदा विभागाने दिली.

या विसर्गामुळे गोदावरी नदीच्या खालच्या प्रवाहात पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांमधील नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. नदीपात्रात तसेच किनाऱ्यावर अडकलेली जनावरे, मालमत्ता सुरक्षित ठिकाणी हलविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नाशिक पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सोनल श्रावणे यांनी दिलेल्या इशाऱ्यात म्हटले आहे की, पावसामुळे विसर्गात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गोदावरी नदीपात्र परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सातारा पोलिसांच्या नवीन घरांचे दिवाळीत वाटप ६९३ घरांची सोडत काढली जाणार

## पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांची माहिती




**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२८, सातारा :** गेल्या दीड वर्षापासून तांत्रिक कारणास्तव रखडलेल्या सातारा पोलिसांच्या नवीन गृहनिर्माण संकुलामधील सदनिकांचे येत्या दिवाळीत वितरण केले जाणार आहे . ६९३ सदनिकांची सोडत काढली जाणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान सातारा शहरातील वाढत्या अवैध व्यवसाया संदर्भात कठोर कारवाया सुरूच आहेत. आपणास असे काही आढळल्यास आपण माहिती द्यावी असे आवाहन त्यांनी केले .

कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी सातारा जिल्ह्यातील पोलिसांच्या कामगिरीचा येथील शिवतेज हॉलमध्ये सविस्तर आढावा घेतला. या आढाव्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी पोलीस अधीक्षक तुषार दोशी,अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, ठाणे गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर व सहा उपविभागाचे उपअधीक्षक यावेळी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचा पारनेर दौरा



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२८, सुपा (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर पुणे महामार्गावर असलेले नारायणगव्हाण गावांमध्ये आज अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या कांदा, सोयाबीन, मक्का, बाजरी, अशा अनेक पिकांची मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्यामुळे सामाजिक कार्यकर्ते सचिन भाऊ शेळके (कारभारी) यांच्या शेतावरती पाहणी करून सरसकट सर्व शेतकऱ्यांना पीक नुकसान भरपाई देण्यासाठी प्रांत चिंचकर साहेब, तहसीलदार गायत्री सौंदाने, पारनेर तालुक्याचे बिडीओ दयानंद पवार तसेच ग्राम विकास अधिकारी, गावचे तलाठी मांडगे, सर्कल भाऊसाहेब पारनेर तसेच सार्वजनिक बांधकाम विभागगाचे श्री.भडके यावेळी पारनेर तालुका पंचायत समिती सदस्य गणेशराव शेळके, वाडेगव्हाण गावचे माजी सरपंच संतोष शेळके, तुकाई माता देवस्थान अध्यक्ष राजेंद्र शेळके, उपसरपंच राजेश शेळके गावचे चेअरमन गणेशराव शेळके, भाऊसाहेब शेळके, बबन खोले मामा, किसन शेळके, मनोज शेळके, मिलिंद शेळके, लतीफ शेख, प्रदीप जाधव, मधुकर शेळके, दिपक शेळके, काशिनाथ नवले मेजर, संदीप शेळके, नाना खोले, दिनेश शेळके,व समस्थ ग्रामस्थ नारायणगव्हाण येथील ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी साहेबांनी सर्व अधिकाऱ्यांना सरसकट पंचनामे करण्यास सूचना देण्यात आल्या.

# गोरजा येथे शेडचे लोकार्पण समारंभ उत्साहात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, भद्रावती (चंद्रपूर) :** भद्रावती तालुक्यातील गोरजा येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृहात स्वर्गीय जगन्नाथ उरकुडे स्मृती प्रित्यर्थ शामसुंदर उरकुडे माजी सरपंच गोरजा यांच्या कडून तुकडोजी भवन येथे लोखंडी शेड सप्रेम भेट देण्यात आले. या लोकार्पण समारंभाचे उद्घाटन मा. हंसराज अहीर अध्यक्ष, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग तथा माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री, भारत सरकार, यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार करण देवतळे वरोरा विधानसभा होते. समारंभाला विशेष अतिथी म्हणून प्रल्हाद पा. गायकवाड प्रतिष्ठित नागरिक, गोरजा, अनिल धानोरकर माजी नगराध्यक्ष, भद्रावती, प्रशांत डाखरे माजी नगरसेवक, अफजलभाई माजी नगरसेवक, भद्रावती, पोलीस पाटील संतोष बल्की, माजी पोलीस उपनिरीक्षक भास्कर पाटील गायकवाड, वैशालीताई शामसुंदर उरकुडे माजी सरपंच, घोडपेठ उपस्थित होते. या कार्यक्रमाला गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. सामुदायिक सहभागामुळे हा सोहळा केवळ लोखंडी शेडपुरता मर्यादित न राहता गावाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी प्रेरणादायी ठरला. या लोकार्पण सोहळ्यामुळे गोरजा गावात विकासाचा नवा संदेश पोहोचला असून, गावकऱ्यांच्या ऐक्याचे दर्शन घडले.